Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 22 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २२ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

दावोस इथल्या जागतिक आर्थिक परिषदेत कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांसाठी सात हजार कोटी अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक निश्चित झाल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. आय बी एम आणि मेटा या आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर समाज माध्यमावरील संदेशाद्वारे त्यांनी ही माहिती दिली. कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान सज्जतेत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचं ठाम प्रतिपादन त्यांनी केलं. भारतातील स्टार्ट अप्सची वाढती संख्या, तसंच सेमी कंडक्टर उत्पादन, नॅनोमीटर तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रातील विकासाचाही त्यांनी यावेळी आढावा घेतला.

****

मुंबई विमानतळाजवळ अत्याधुनिक इनोव्हेशन सिटी अर्थात नवोन्मेष शहर उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस इथं केली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात टाटा समूहाकडून तब्बल ११ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होणार असून, स्टार्टअप उद्योजकांच्या समुदायाला पाठबळ देणं हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. दावोस परिषदेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी हर्ले ऑफ लंडनचे संस्थापक संजीव कुमार यांच्याशी संवाद साधत आरोग्य आणि औषध क्षेत्रातील संधींवर चर्चा केली. तसंच सँडोझ स्मॉल मोलेक्युल अँड अँटी-इन्फेक्टिव्ह ऑपरेशन्सचे प्रमुख कार्लो गरगुइलो यांच्यासोबत उच्च दर्जाची आणि परवडणारी जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. जागतिक गुंतवणूकदारांना अनुकूल धोरणांमुळे महाराष्ट्र औद्योगिक, आरोग्य आणि नवोन्मेष क्षेत्रात आघाडीवर राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौर पदासाठीच्या आरक्षणाची सोडत आज काढण्यात येणार आहे. या सोडतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि खुल्या प्रवर्गासाठी महापौर पदाचं आरक्षण निश्चित केलं जाणार आहे.

****

मुंबई विद्यापीठात डॉ. आंबेडकर सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना होणार आहे. काल नवी दिल्लीत मुंबई विद्यापीठ तसंच सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयादरम्यान याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या केंद्राच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोगासह विविध सरकारी स्पर्धा परीक्षा, परदेशी शिक्षणासाठीच्या पात्रता परीक्षा यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचं प्रशिक्षण, मार्गदर्शन, अध्ययनसामग्री तसंच वैयक्तिक सल्ला आणि समुदेशनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

****

नाशिकमध्ये देवळाली इथल्या लष्कराच्या तोफखाना प्रशिक्षण संस्थेत काल तोपची वार्षिक युद्धसराव प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. यावेळी नागरिकांनी बोफोर्स, धनुष्य, हॉवित्झर, वज्रसह आठ तोफा अन मल्टी बॅरल रॉकेट लाँचरचा प्रहार आणि काही क्षणातच अचूक लक्ष्यभेद झाल्याचा थरार अनुभवला. भारतीय सीमा सुरक्षा दलाचे सैनिक प्रथमच या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी झाले.

****

पुणे ग्रँड टूर-२०२६ सायकलिंग स्पर्धेच्या मराठा हेरिटेज सर्किट नावाच्या दुसऱ्या टप्प्यात चीनच्या ली निंग स्टार संघाचा सायकलपटू ल्यूक मडग्वे यानं सलग दुसरा विजय मिळवत यलो जर्सी वरील आपलं वर्चस्व कायम राखलं. पुण्याच्या कॅम्प परिसरातील लेडीज क्लब इथून सुरु झालेला १०५ किलोमीटरचा हा टप्पा सिंहगड रस्त्यावर नांदेड सिटी इथं संपला. डोंगराळ भूभाग, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाचे रस्ते यामुळे हा टप्पा सायकलपटूंच्या ताकद, तंत्र आणि सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरला. स्पर्धेचा तिसरा १३४ किलोमीटरचा टप्पा आज सासवड-पुरंदर ते बारामती दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. चौथ्या टप्प्यात उद्या बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावर सायकलपटू शर्यत करतील.

****

भारतीय जल कार्य संघटना-आयवॉच्या मुंबई केंद्राचं अठ्ठावन्नावं वार्षिक जल अधिवेशन आजपासून छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित करण्यात आलं आहे. शहरातील एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात होणाऱ्या या तीन दिवसीय अधिवेशनात देशभरातील एक हजार अभियंते सहभागी होणार आहेत.

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त बीड इथं बोलींचा जागर अंतर्गत गोरमाटी बोली या विषयावर काल विशेष कार्यक्रम घेण्यात आला. यानिमित्त शहरातून ग्रंथदिंडी आणि शोभा यात्रा काढण्यात आली. यात्रेत विद्यार्थ्यांनी बंजारा वेशभुषा, नृत्य, लोकगीते सादर केली.

****

जालना पंचायत समितीमधला कंत्राटी गृहनिर्माणअभियंता ज्ञानेश्वर चौधरी याला १० हजार रुपये लाच घेताना काल पकडण्यात आलं. घरकूल आवास योजनेचा दुसरा हप्ता देण्यासाठी त्याने तक्रारदाराकडून ही लाच मागितली होती.

****

छत्रपती संभाजीनगर इथं गावठी पिस्तुलाची खरेदी-विक्री करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. दहशतवाद विरोधी पथक गस्तीवर असताना, त्यांना छत्रपती संभाजीनगर ते जालना रोडवरून एक जण पिस्तुल विक्रीसाठी जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी गावठी पिस्तुल आणि जिवंत काडतुसांसह दोन जणांना ताब्यात घेतलं.

****

नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी काल पूर्णा रेल्वे स्थानकाची तपासणी केली.

****